# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.148/२०१६**

**संदर्भ:- जाहिरात क्र.१३, दि.३० एप्रिल, २०१३**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी / शिक्षकेतर सेवकांची गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील शासनमान्य रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजी जाहिरात क्रमांक १३ प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :

१. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक ०२ जून, २०१५ रोजी व त्याअनुषंगाने निर्गमित केलेल्या इतर शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने पदभरतीवर निर्बंध आणलेले आहेत.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र.प्रानिमं १२१४/प्र.क्र.(४३/१४)१३-अ, दिनांक ०५ जून, २०१४ नुसार गट 'ब' संवर्गातील कोणत्याही पदांकरिता निवड करताना मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येऊ नये, असे निर्देश दिले आहेत.

३. उपरोक्त मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०२ जून, २०१५ च्या शासन निर्णयातून विद्यापीठास सूट देऊन रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास मान्यता देण्याबाबत विद्यापीठाने केलेली विनंती शासनाने पूर्णपणे मान्य न करता काही अंशी मान्य करुन गट 'अ' व गट 'ब' मधील काही पदे भरण्याची परवानगी दिलेली आहे.

४. उपरोक्त नमूद मुद्दयांच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन परिषदने दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी झालेल्या सभेमध्ये ठराव क्र. म:१६२/१९०७१६ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील शासनमान्य रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात क्रमांक १३ ची भरती प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

**( डॉ.नरेंद्र मा.कडू )**
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 4766
दिनांक : 27 AUG 2016

C:\Documents and Settings\abc\My Documents\Bio-Metric\Circular 1.docx